सकाळ



कोल्हापूर : स्वाती शिंदे हिची राष्ट्रकुल स्पर्धेसाठी निवड झाल्यानंतर तिला शुभेच्छा देताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, धैर्यशील पाटील आदी.

# 'देवचंद'च्या स्वाती शिंदेची राष्ट्रकुल स्पर्धेसाठी निवड

नानीबाई चिखली, ता. ३ : अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी स्वाती संजय शिंदे हिने अयोध्या येथे नुकत्याच झालेल्या वरिष्ठ गट कुस्ती स्पर्धेत ५३ किलो वजन गटात रौप्यपदक जिंकले. तिची दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. स्वाती मुरगूड येथील लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय कुस्ती संकुल येथे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक दादा लवटे, माजी नगराध्यक्ष सुखदेव येरूडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे.

राष्ट्रकुल स्पर्धेकरिता तिला दोन ते तीन लाख रूपये खर्च येणार असून, समाजातील दानशूर व्यक्तींनी मदत करावी असे आवाहन महाविद्यालयाने केले. दरम्यान त शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सिनेट सदस्य धैर्यशील पाटील यांनी भेट घेत तिला शुभेच्छा देतानाच आर्थिक मदतीचे आश्वासन दिले.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिष शाह, उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह, सुबोध शाह यांचे प्रोत्साहन लाभले. प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत शाह, उपप्राचार्य डॉ.एम.एम.बागवान, जिमखाना प्रमुख रवींद्र चव्हाण, क्रीडा शिक्षक निरंजन जाधव, संतोष वांगळे, वैभव सोनार, सुवर्णा पाटील यांचे सहकार्य लाभले.

लोकमत

# कवी वसंत पाटणकर यांना समीक्षा पुरस्कार

## कुलगुरू डी. टी. शिर्के यांची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक, कवी प्रा. वसंत पाटणकर यांना शुक्रवारी जाहीर झाला. ५१ हजार रुपये, सन्मानचिन्ह, ग्रंथभेट असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार वितरण दि. २९ जानेवारी २०२२ रोजी ज्येष्ठ विचारवंत डॉ. गणेश देवी यांच्या हस्ते विद्यापीठात होणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.



वसंत पाटणकर

पुरस्कार निवड समितीचे सदस्य म्हणून रंगनाथ पठारे, डॉ. राजन गवस, अविनाश सप्रे यांनी काम पाहिले. कवी पाटणकर यांचे मराठी समीक्षा लेखनातील योगदान भरीव स्वरूपाचे आहे. मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागातून प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून ते निवृत्त झाले आहेत. 'विजनातील कविता' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. कविता या साहित्य प्रकाराची तात्त्विक व उपयोजित समीक्षा त्यांनी लिहिली. कविता या साहित्य प्रकाराची सुसंगत अशी नवी व्यवस्था त्यांनी लावली. काव्य समीक्षक म्हणून पाटणकर यांची विशेष ओळख असल्याची माहिती डॉ. रणधीर शिंदे आणि डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली.

सकाळ

# प्रा. पाटणकर यांना पाटील समीक्षा पुरस्कार

## २९ जानेवारीला पुरस्कार वितरण

सकाळ वृत्तसेवा



प्रा. पाटणकर

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठातर्फे दिला जाणारा डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक, कवी प्रा. वसंत पाटणकर यांना जाहीर झाला आहे. ५१ हजार रुपये, सन्मानचिन्ह, ग्रंथभेट असे पुरस्काराचे स्वरूप आहे. हा पुरस्कार ज्येष्ठ भाषा तज्ज्ञ गणेश देवी यांच्या हस्ते २९ जानेवारीला विद्यापीठात देण्यात येईल.



नामवंत समीक्षक, अनुवादक आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. म. सु. पाटील यांच्या कार्याची स्मृती म्हणून डॉ. म. सु. पाटील यांच्या नावे हा पुरस्कार प्रतिदोन वर्षांनी दिला जातो. पाटील यांच्या कुटुंबीयांच्या वतीने देण्यात आलेल्या देणगीतून पुरस्कार दिला जातो. ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना पहिल्या पुरस्काराने सन्मानित केले होते. यावर्षी प्रा. वसंत पाटणकर यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. प्रा. पाटणकर यांचे मराठी समीक्षा लेखनातील योगदान भरीव स्वरूपाचे आहे. प्रा. पाटणकर मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागातून प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून निवृत्त झाले आहेत.

'विजनातील कविता' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. कविता या साहित्य प्रकाराची तात्त्विक व उपयोजित समीक्षा त्यांनी लिहिली. 'कविता: संकल्पना, निर्मिती आणि समीक्षा' व 'कवितेचा शोध' या ग्रंथातील त्यांची समीक्षा मौलिक ठरली आहे. कविता या साहित्यप्रकाराची शिस्तशीर व सुसंगत अशी नवी व्यवस्था त्यांनी लावली. काव्यसमीक्षक म्हणून वसंत पाटणकर यांची विशेष ओळख आहे. आधुनिक मराठी काव्याची त्यांची समीक्षा महत्त्वाची ठरली. कविता या साहित्यप्रकाराविषयीची आस्था, जिव्हाळा आणि आधुनिक मराठी काव्याची मर्मदृष्टी त्यांच्या लेखनात आढळून येते. कवी ग्रेस व नामदेव ढसाळ या कवींबरोबरच साठनंतरच्या मराठी कवितेची त्यांची समीक्षा साक्षेपी व चिकित्सक ठरली आहे. याबरोबरच ग. स. भाटे, द. ग. गोडसे, अरूण कोलटकर यांच्यावरील त्यांची संपादने महत्त्वाची ठरली आहेत. निवड समितीचे सदस्य म्हणून रंगनाथ पठारे, डॉ.राजन गवस व डॉ. अविनाश सप्रे यांनी काम पाहिले.

तरुण भारत

# प्रा. वसंत पाटणकर यांना 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार

**कोल्हापूर :** ज्येष्ठ समीक्षक, कवी, प्रा. वसंत पाटणकर



यांना शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दिला जाणारा डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार जाहीर झाला. ५१ हजार रुपये, सन्मानचिन्ह, ग्रंथभेट असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार वितरण ज्येष्ठ विचारवंत डॉ. गणेश देवी यांच्याहस्ते २९ जानेवारी, २०२२ रोजी विद्यापीठात पार पडणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी ही घोषणा शुक्रवारी केली. प्रा. पाटणकर यांचे मराठी समीक्षा लेखनातील योगदान भरीव स्वरूपाचे आहे. प्रा. पाटणकर मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागातून प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून निवृत्त झाले आहेत. कवी ग्रेस व नामदेव ढसाळ या कवींबरोबरच साठनंतरच्या मराठी कवितेची त्यांची समीक्षा साक्षेपी व चिकित्सक ठरली आहे. पुरस्कार निवड समितीचे सदस्य म्हणून रंगनाथ पठारे, डॉ. राजन गवस, डॉ. अविनाश सप्रे यांनी काम पाहिले.

04 DEC 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महामानवांना समजून घेणे, माणूस बनण्याची प्रक्रिया

## प्रा. शरद गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्राच्या विविध स्पर्धांतील पारितोषिकांचे वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महामानवांना समजून घेणे ही माणूस बनण्याच्या प्रक्रियेसाठीची महत्त्वाची सुरुवात आहे, असे प्रतिपादन विचारवंत प्रा. शरद गायकवाड यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

प्रा. गायकवाड म्हणाले, फुले, शाहू, आंबेडकर या महामानवांना समजून घेतले तर खऱ्या अर्थाने माणूस बनण्याच्या प्रक्रियेची ती सुरुवात ठरते.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, बाबासाहेबांचा ग्रंथप्रेमाचा आदर्श युवकांनी अंगिकारणे आवश्यक आहे. बाबासाहेबांचे हे ग्रंथप्रेम लक्षात घेऊन आपणही अफाट वाचन केले पाहिजे.



**कोल्हापूर : विजेत्यांना पारितोषिके प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत एस. एस. महाजन, शरद गायकवाड, प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे.**

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे वक्तृत्व स्पर्धा व प्रश्नमंजूषा स्पर्धा ऑनलाईन घेण्यात आल्या. त्यातील विजेत्यांना कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

केंद्र संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. तेजश्री सावंत-मोहरेकर यांनी केले, तर प्रा. अविनाश भाले यांनी आभार मानले. कार्यक्रमाला प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे, प्रकाश कुंभार, गिरीश मोरे, दीपा श्रावस्ती, अमोल मिणचेकर, व्ही. एस. खंडागळे, मुरली भानारकर, आनंद खामकर, तेजपाल मोहरेकर, सुशांत पंडित, विक्रम कांबळे आदी उपस्थित होते.

वक्तृत्व स्पर्धा विजेते (पदव्युत्तर स्तर गट) : मिथुन माने, प्रवीण येवले (कोल्हापूर), ऋषीकेश घुटुगडे (कोल्हापूर), उत्तेजनार्थ : प्रणय निमसरकार (इस्लामपूर), प्रसाद लोखंडे (कोल्हापूर), प्राजक्ता गायकवाड (सातारा).

वक्तृत्व स्पर्धा : (पदवीस्तर गट) : संभाजी पाटील (कोल्हापूर), गुरुराज रसाळ (सातारा), मृणाल कोठाली (सांगली), उत्तेजनार्थ : श्रद्धा चोपडे (पेठवडगाव), श्रुती कांबळे, मनाली शिरगावे (कोल्हापूर).

प्रश्नमंजूषा स्पर्धा : तनुजा पाटील (कराड), प्रतिभा पाटील (तासगाव), स्वप्नाली देसाई (कोल्हापूर), उत्तेजनार्थ : रोहन गुरव (कोडोली), शिवांजली पाटील (कोल्हापूर), अश्विनी गुदमेवार (कोल्हापूर).

04 DEC 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महामानवांना समजून घेणे आवश्यक : प्रा. गायकवाड

कोल्हापूर, ता. ३ : ''महामानवांना समजून घेणे ही माणूस बनण्याच्या प्रक्रियेसाठीची महत्त्वाची सुरुवात आहे,'' असे प्रतिपादन प्रा. शरद गायकवाड यांनी नुकतेच केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. ऑनलाईन घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्यांना कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी प्रा. गायकवाड म्हणाले, ''महामानवांच्या विचारांना व्यापक भूमिकेतून समजून घेण्याची आज गरज आहे. जात, धर्म, प्रांत यात न अडकविता फुले, शाहू, आंबेडकर या महामानवांना समजून घेतले तर खऱ्या अर्थाने माणूस बनण्याच्या प्रक्रियेची ती सुरवात ठरते.''

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार सर्व समाज घटकांपर्यंत केला पाहिजे. त्यांचा ग्रंथप्रेमाचा आदर्श युवकांनी अंगिकारणे आवश्यक आहे.''

केंद्र संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. तेजश्री सावंत-मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अविनाश भाले यांनी आभार मानले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. डॉ. प्रकाश कुंभार, प्रा. डॉ. गिरीश मोरे, डॉ. दीपा श्रावस्ती, प्रा. अमोल मिणचेकर, डॉ. व्ही. एस. खंडागळे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलताना प्रा. शरद गायकवाड. सोबत (डावीकडून) डॉ. एस. एस. महाजन, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

0 4 DEC 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांगांना आपल्यापेक्षा वेगळे समजू नका

## 'निवांत'च्या संस्थापक मीरा बडवे; शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा

टेंबलाईवाडी, ता. ३ : दिव्यांग व्यक्तींना वेगळे समजणे चुकीचे आहे. त्यांना सामाजिक पातळीवर समजून घेऊन मुख्य प्रवाहात सक्षमपणाने सामील होऊ द्यावे, असे मत पुणे येथील निवांत अंध मुक्त विकासालयाच्या संस्थापक-संचालक मीरा बडवे यांनी आज येथे व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, युजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज् आणि सामाजिक वंचितता व



ऑनलाईन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मीरा बडवे.

समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

बडवे यांनी ध्वनी चित्रफितीच्या माध्यमातून निवांत अंध मुक्त विकासालयाच्या कार्याची ओळख करून दिली. डॉ. नमिता खोत यांनी स्वागत, प्रास्ताविक व परिचय करून दिला. यावेळी बडवे म्हणाल्या, 'दिव्यांग तसेच विशेष दृष्टी मुले यांना सर्वसामान्यांहून वेगळे समजणे चुकीचे आहे. सामाजिक पातळीवर त्यांना समजून घेऊन मुख्य प्रवाहात सक्षमपणाने सामील होण्यासाठी मदत करण्याची आवश्यकता आहे. अद्ययावत तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञानाचा आधार घेऊन दिव्यांगांसाठी सहाय्यकारी अशा स्वरुपाची साधने व सुविधा यांची निर्मिती करून त्यांचे जगणे सुकर होण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षांसह जीवनाच्या विविध परीक्षांनाही सामोरे जाण्यासाठी त्यांना सक्षम करण्यासाठीही मदतीची आवश्यकता आहे. त्यासाठी चिरंतन चालणारी व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे.' लेखिका सोनाली नवांगुळ म्हणाल्या, 'दिव्यांग विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ तत्पर आणि संवेदनशील असल्याचा मला वैयक्तिक अनुभव आहे. आपल्या वेगळ्या जगण्याचा विद्यापीठाच्या व्यासपीठावरून परामर्ष घेण्याची मिळालेली संधी खूप महत्त्वाची आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी काही नवे उपक्रम विद्यापीठाच्या माध्यमातून उभे करूया, जे राज्य आणि देशभरात आदर्शवत ठरतील.' डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. जगन कराडे, अधिविभागातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व विविध महाविद्यालयांचे ग्रंथपाल उपस्थित होते.

तरुण भारत

# दिव्यांगांना सर्वसामान्यांपेक्षा वेगळे समजणे गैर

प्रतिनिधी
कोल्हापूर

दिव्यांगांप्रती भेदभाव बाळगून त्यांना सर्वसामान्यांपेक्षा वेगळे समजणे गैर आहे, असे मत पुणे येथील निवांत अंधमुक्त विकासालयाच्या संस्थापक-संचालक मीरा बडवे यांनी शुक्रवारी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, युजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलीटीज् आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित विशेष ऑनलाईन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

मीरा बडवे म्हणाल्या, दिव्यांग तसेच विशेष दृष्टी मुले यांना सर्वसामान्यांहून वेगळे समजणे चुकीचे आहे. स्पर्धा परीक्षांसह



- **मीरा बडवे यांचे मत**
- **जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विशेष ऑनलाईन कार्यक्रम**

जीवनाच्या विविध परीक्षांनाही सामोरे जाण्यासाठी त्यांना सक्षम करण्यासाठीही मदतीची आवश्यकता आहे. त्यासाठी चिरंतन चालणारी व्यवस्था निर्माण करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

दिव्यांग विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ तत्पर, संवेदनशील असल्याचा मला अनुभव आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी नवे उपक्रम विद्यापीठाच्या माध्यमातून उभे करूया, जे राज्य आणि देशभरात आदर्शवत ठरेल, अशी आशा लेखिका सोनाली नवांगुळ यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, मीरा बडवे यांचे दिव्यांगांसाठीचे काम मोलाचे आहे. टेक व्हिजन, चॉकलेट फॅक्टरी आदी उपक्रमांद्वारे दिव्यांगांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न प्रेरणादायी आहेत.

डॉ. नमिता खोत यांनी स्वागत केले. तर डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्यासह डॉ. जगन कराडे, अधिविभागांतील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व विविध महाविद्यालयांचे ग्रंथपाल उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठाकडून ३० दिवसांत ७३९ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने परीक्षा निकाल वेळेत लावण्याची परंपरा कायम ठेवली आहे. परीक्षा विभागाने ३० दिवसांत विविध अभ्यासक्रमांच्या सुमारे ७३९ परीक्षांचे निकाल जाहीर केले. कोरोनामुळे परीक्षा घेताना परीक्षा विभागास अडचणींचा सामना करावा लागला. योग्य नियोजन, तांत्रिक अडचणी सोडवून परीक्षा विभागाने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या मार्च २०२१ उन्हाळी सत्रातील परीक्षांचे निकाल ऑनलाईन पद्धतीने घोषित केले आहेत. यावर्षी उन्हाळी सत्रात बीए, बीकॉम, बीएस्सी, एमए, एम.कॉम., एम.एस्सी. अभियांत्रिकी, लॉ, फार्मसी, आर्किटेक्चर आदी विविध अभ्यासक्रमांच्या २ लाख २० हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

सकाळ

# विद्यापीठ सेवक संघाचे अतुल एतावडेकर यांचे निधन



**कोल्हापूर, ता. ३ :** शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे माजी सरचिटणीस अतुल जयवंतराव एतावडेकर (वय ५५) यांचे आज निधन झाले. घरी त्यांना हृदयविकाराचा झटका आला, उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. सेवक संघाचे ते धडाडीचे नेते होते. विद्यापीठाच्या विविध प्रश्नांवर त्यांनी परिणामकारक आंदोलन केले. त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, मुलगा व दोन भाऊ असा परिवार आहे. रक्षाविसर्जन रविवारी (ता. ५) होणार आहे.

अतुल एतावडेकर हे १९९२ मध्ये शिवाजी विद्यापीठात रुजू झाले. अकौंट्स, परीक्षा विभागासह विद्यापीठाच्या बहुतांश विभागात त्यांनी काम केले. सध्या ते आजीवन अध्यासन विभागात काम करीत होते. २००५ पासून ते विद्यापीठ सेवक संघाच्या माध्यमातून सक्रिय होते. सरचिटणीस, अधिसभा सदस्य या जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या होत्या. सध्या ते महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे पश्चिम महाराष्ट्र समन्वयक होते. अभ्यासू मांडणी, संघटन कौशल्य आणि मनमिळावू स्वभावामुळे सर्व कर्मचाऱ्यांमध्ये ते लोकप्रिय होते. सर्व विद्यापीठाच्या समान नागरी सेवा नियम समितीवर त्यांनी काम केले होते. २०११ मध्ये त्यांना आजी-माजी विद्यार्थी कृती समितीचा शिव पुरस्कार, २०२१ मध्ये ज्येष्ठ नागरिक मंचाच्या पुरस्काराने गौरविले होते. सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत यांच्या निधनानंतर एतावडेकर यांचे निधन झाल्याने आधारवड हरपल्याची भावना कर्मचाऱ्यांमधून व्यक्त होत होती.

04 DEC 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविभागीय रोपमल्लखांब स्पर्धेत शिवराज महाविद्यालय विजेता

## आजरा महाविद्यालयास उपविजेतेपद : विजेत्या संघावर कौतुकाचा वर्षाव

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

आंतर-विभागीय रोपमल्लखांब स्पर्धेत गडहिंग्लजच्या शिवराज महाविद्यालयाच्या महिला संघाने सांघिक गटात १५ गुण मिळवून विजेतेपद पटकावले. तसेच आजरा महाविद्यालयाच्या महिला संघाने ८ गुणांसह उपविजेतेपद मिळवले. शिवराज महाविद्यालयातील मल्लखांब हॉलमध्ये ही स्पर्धा झाली. शिवाजी विद्यापीठ व शिवराज महाविद्याल यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धा विजेत्या शिवराज महाविद्यालयाच्या समिक्षा गावडे, प्रणाली फालगुडे, सुकन्या रणदिवे, वृषाली जाधव व शुभांगी पाटील, पल्लवी जाधव यांचा समावेश होता. या संघाला शारिरीक शिक्षण संचालक राहूल मगदूम, प्रा. जयवंत पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे. आजरा महाविद्यालयाच्या संघात साक्षी पाटील, सानिका पाटील, सानिका बिर्जे, मीनाक्षी पाटील, सपना कांबळे यांचा समावेश आहे. या संघाला प्राचार्य डॉ. अशोक सादले, शारिरीक शिक्षण संचालक डॉ. धनंजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे. बक्षीस वितरण समारंभात मान्यवरांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या संघांना चषक देऊन गौरवले.



**कोल्हापूर : आंतर-विभागीय रोपमल्लखांब स्पर्धेचे विजेतेपद मिळवलेल्या शिवराज महाविद्यालयाच्या महिला संघाला मान्यवरांच्या हस्ते चषक देऊन गौरवले. यावेळी रमेश रिंगणे, डॉ. अनिल कुऱ्हाडे, डॉ. पी. टी. गायकवाड, अॅड. सतिश हट्टी, प्राचार्य एस. एम. कदम व राजू मोलगे आदी उपस्थित होते.**

यावेळी माजी नगराध्यक्ष रमेश रिंगणे, शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, शिवराज विद्या संकुलचे सचिव अनिल कुराडे, अॅड. सतिश हट्टी, प्राचार्य एस. एम. कदम व राजू मोलगे आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# कॉमर्स कॉलेजला विभागीय बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय बॅडमिंटन पुरुष स्पर्धेत येथील देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सला विजेतेपद मिळाले. स्पर्धेचे विवेकानंद कॉलेजमध्ये झालेल्या या स्पर्धेत उपांत्य फेरीत कॉमर्स कॉलेजने डी. वाय. पाटील ४–१ अशा सेट फरकाने मात करून अंतीम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात विवेकानंद कॉलेजवर ३–२ अशा सेट फरकाने मात करून विजेतेपद मिळवले. आयआयटी साखराळे येथे होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेसाठी या संघाची निवड केली. विजयी संघामध्ये ऋषिकेश माने, आदित्य कांबळे, व्यंकटेश भोसले, ऋषिकेश धुळे, पृथ्वीराज उन्हाळकर यांचा समावेश आहे. महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, संचालक डॉ. शरद बनसोडे, प्रा. प्रफुल्ल मांगोरे–पाटील, अक्षय मनवाडकर यांचे मार्गदर्शन लाभले.